

आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर
वाचा एका क्लिकवर
www.elaturprabhat.in






# दैनिक लातूर प्रभात

E-mail :- laturprabhat@gmail.com

मुख्य संपादक : रघुनाथ बनसोडे मो.नं.८८३०२ ५०६४५,

RNI No.: - MAHMAR/2017/72894 ● वर्ष ८ वे ● अंक २९१ वा ● शुक्रवार दि. २५ एप्रिल २०२५ ● किंमत २ रूपया ● पाने ४ ●





## झरोका

एक – हिंदी भाषा सक्तीचा आदेश राज्य सरकारने माघारी घेतला आणि शिक्षण मंत्री दादा भुसे यांच्या आदेशाचा चक भुसा केला गेला. यातील गौडबंगाल काय आहे, तेच कळत नाही. डोकं बधिर झालं आहे.

दुसरा – अरे, मुख्यमंत्री किंवा वजनदार मंत्रीच मनमानी निर्णय घेऊ शकतात, इतराप्रमाणे शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी केंद्रीय शिक्षण समितीचा किंवा मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांच्याशी चर्चा न करता हिंदी भाषा शक्तीचे आदेश पारित केला आणि वादळ उठले त्यात माघार घ्यावी लागली, यातूनच दादा भुसे यांना सबुरी, सक्ती लागू झाली समजलं.

एक – अहो, चंद्रकांत दादा पाटील पण तसे असे निर्णय घेत होते. त्यांना झापले नाही, मग मंत्री दादा भुसे यांच्यावर माघारीची अशी वेळ का आणली गेर्ली हेच कळत नाही.

दुसरा – अरे, चंद्रकांत दादा पाटील हे भाजपातील जुने नेते आहेत, भाजपाचे प्रदेशाध्यक्ष राहिलेले आहे, कालच त्यांनी गृहमंत्री पदाबाबत बोलले त्यांची इच्छा बोलून दाखवली त्यांच्यात दम आहे, धक्का देण्याची कुवत आहे भुसे यांचे तसे नाही केवळ कोटा पूर्ण करण्यासाठी त्यांना मंत्रिपद दिले गेले आहे ते राजकारण तुला कळणार नाही गप्प बस.

एक – अहो, काहीतरी बोलू नका, मीच विषय काढला आणि मलाच राजकारण कळत नाही म्हणता, तुम्ही काय स्वत:ला चाणक्य समजता काय, असले भुसे, पाटील, फडणवीस वगैरे दिल्ली स्वराचे होयबा आहेत. मी कोणाचा गुलाम नाही समजलं.

## काय बोलता राव ?

आपण अमेरिकेसारखे बनले पाहिजे, महासत्ता भारत राष्ट्र बनले पाहिजे, भारताचे अर्थव्यवस्था पहिल्या दुसऱ्या तिसऱ्याची उच्चांकी बनली पाहिजे, सबका विकास झाला पाहिजे, अच्छे दिन आले पाहिजेत, पण भारतीय नागरिकांच्या सुरक्षेचे काय, आधी सुरक्षा द्या आणि नंतर बोला असा प्रकट सवाल कौस्तुभ लेले या नागरिकाने प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना केला.

**काय बोलता राव !**

अरे, डोंबिवली येथील भीषण दंगलीत कौस्तुभ लेले यांचे तीन भाऊ मारले गेले दंगल अचानक घडली की सुनियोजित होती हे पोलिसांनाही कळले नाही, पण डोंबिवली मधील दंगलीत लेले परिवारातील संजय लेले, हेमंत जोशी, अतुल माने ही सख्खे मावस भाऊ मारले गेले, त्या द्विगणता अवस्थेत लेले याने अमेरिकेसारखे व्हायचे तेव्हा व्हा, पण अगोदर भारतीय नागरिकांची सुरक्षा बघा, संरक्षण न्याय द्या, भंपक बाजी कसं करू नका, नागरी सुविधा संरक्षणाला प्राधान्य द्या, असा शब्दात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना खडे बोल सुनावून कायदा व सुव्यवस्थेचा विषय ऐरणीवर ठेवला मग बोला दाजीबा !




# महाराष्ट्रातील ५०० पर्यटक आतापर्यंत राज्यात दाखल

**१८४ प्रवाशांना घेऊन राज्य सरकारची दोन विशेष विमाने पोहोचली,२३२ प्रवाशांसाठी उद्या आणखी एक विशेष विमान,मुख्यमंत्र्यांनी घेतला गिरीश,महाजनांकडून आढावा, लष्करी रुग्णालयातील डॉक्टरांशी संवाद,मंत्रालयात विशेष कक्ष, महाराष्ट्र सदनातूनही समन्वय**



मुंबई, : पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी निर्देश दिल्यानंतर विविध प्रयत्नांतून गेल्या २ दिवसात आतापर्यंत सुमारे ५०० पर्यटक राज्यात परतले आहेत. राज्य सरकारने इंडिगो आणि एअर इंडियाच्या दोन विशेष विमानाची व्यवस्था पर्यटकांसाठी केली होती, त्यातून १८४ पर्यटक मुंबईत दाखल झाले आहेत. दरम्यान, आणखी २३२ प्रवाशांसाठी उद्या एका विशेष विमानाची व्यवस्था राज्य सरकार करीत आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या घटनेनंतर आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांना तातडीने काश्मिरला जाण्यास सांगितले होते. गिरीश महाजन यांच्याकडून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज एकूणच स्थितीचा आढावा घेतला. उद्यासाठी आणखी विमाने करायची असतील, तर करा, त्याचा खर्च राज्य सरकार देईल, असे त्यांनी सांगितले. गिरीश महाजन यांनी लष्कराच्या रुग्णालयात उपचार घेत असलेल्या महाराष्ट्रातील पर्यटकांची भेट घेतली, तेव्हा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्हीडिओ कॉलवर त्या पर्यटकांशी संवाद साधला आणि उपचार करणार्या तेथील डॉक्टरांचे आभारही मानले.

काश्मिरातील महाराष्ट्राच्या पर्यटकांना परत आणण्यासाठी मंत्रालय, मुख्यमंत्री कार्यालय आणि महाराष्ट्र सदनातील कक्ष अशी त्रिस्तरीय यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली असून, महाराष्ट्राच्या कानाकोपर्यातून येणाऱ्या विनंतीवर काम केले जात आहे. काही पर्यटकांची कालिका धाम, जम्मू येथे राहण्याची व्यवस्था केली गेली. अमरावती येथील सुमारे १४ पर्यटक येथे थांबले होते. काही पर्यटक मिळेल त्या व्यवस्थेने जम्मूवरुन दिल्लीकडे रवाना झाले असून, त्यांची दिल्ली येथे व्यवस्था करण्यात येत आहे. उद्या काश्मिरातून येणाऱ्या विशेष विमानात अकोला, अमरावती येथील पर्यटक असणार आहेत. दिल्लीत महाराष्ट्र सदनात प्रवाशांच्या याद्या सातत्याने तयार केल्या जात असून, गरज पडली तर परवाही विशेष विमान करण्याची तयारी राज्य सरकारतर्फे करण्यात येत आहे.

# ‘चिल्ड्रेन्स एड् सोसायटी’ला आवश्यक सहकार्य करण्यास जिल्हा प्रशासन कटिबद्ध - मुंबई शहर जिल्हाधिकारी आंचल गोयल



मुंबई, :– प्रशासकीय सेवेच्या माध्यमातून समाजातील शेवटच्या घटकांपर्यंत पोहोचून सेवा करण्याची संधी असते. चिल्ड्रेन्स एड् सोसायटीच्यावतीने राबविण्यात येत असलेल्या उपक्रमाबदल जिल्हा प्रशासन संवेदनशील असून या संस्थेस आवश्यक ते सहकार्य करण्यास जिल्हा प्रशासन कटिबद्ध असल्याचे मुंबई शहर जिल्हाधिकारी आंचल गोयल यांनी सांगितले.

जिल्हाधिकारी कार्यालय मुंबई शहर व जिल्हा महिला व बाल विकास कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या एकात्म मानव दर्शनाच्या हीरक महोत्सवानिमित्त चिल्ड्रेन्स एड् सोसायटीच्या उमरखाडी येथील निरीक्षणगृह/बालगृह येथे जिल्हाधिकारी आंचल गोयल यांच्या अध्यक्षतेखाली बालगृहातील मुलांसमवेत कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

जिल्हाधिकारी श्रीमती गोयल पुढे म्हणाल्या की, ‘पंडित दीनदयाळ यांच्या एकात्म मानव दर्शनाचे महत्त्व तसेच मानवाकडून जीवनात झालेल्या चुका दुरुस्त करण्याच्या संधीचे महत्त्व सांगून त्यांच्या जीवनातील विविध टप्प्यावरील अनुभवाचे कथन केले.

यावेळी या सोसायटीकडून करण्यात येत असलेल्या कामकाजाचा आढावा घेतला व बालनिरीक्षणगृहातील मुलांकडून करण्यात येत असलेल्या कौशल्याभिमूख कामकाजाची माहिती घेऊन परिसराची पाहणी केली.

या प्रसंगी मुंबई शहर उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) गणेश सांगळे, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी शोभा शेलार, डोंगरी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक महेश ठाकूर, तसेच संस्थेचे सर्व अधिकारी, कर्मचारी, जिल्हा महिला व बालविकास विभागाचे कर्मचारी उपस्थित होते.

# पाण्याचा पिवळसरपणा कमी, नागरिकांना स्वच्छ पाण्याचा पुरवठा



लातूर /प्रतिनिधी :लातूर शहर महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागाकडून हरंगुळ येथील जलशुद्धीकरण केंद्रात पाण्याचे शुद्धीकरण करून नागरिकांना स्वच्छ पाण्याचा पुरवठा केला जात असल्याची माहिती मनपाच्या वतीने देण्यात आली.

लातूर शहराला धनेगाव येथील मांजरा प्रकल्पातून पाणीपुरवठा होतो. धरणातून उचललेले पाणी हरंगूळ येथील जलशुद्धीकरण केंद्रात आणले जाते. पाटबंधारे विभागाच्या वतीने सध्या कॅनलच्या माध्यमातून पाण्याचे वितरण केले जात आहे. तसेच सध्या तापमानही वाढलेले आहे. तापमानामुळे पाण्याची पातळी घटत असून पाण्यात विरघळलेल्या ऑक्सिजनचे प्रमाण कमी होत आहे. यामुळे शेवाळ निर्मितीची प्रक्रिया जलद गतीने होते. हे पाणी क्लोरीनच्या सानिध्यात आल्यानंतर काही वेळा त्याचा रंग पिवळसर होतो. मनपाच्या वतीने हरंगुळ येथील जलशुद्धीकरण केंद्रात ब्लिचिंग पावडर, तुरटी, क्लोरीन गॅस,तसेच पीएसी पावडरचा वापर करून पाणी शुद्ध केले जाते. पाण्याचा पिवळसरपणा कमी केला जातो.हेच पाणी शहरात पुरवठा केले जात आहे.

मांजरा प्रकल्पावरून हरंगुळ जलशुद्धीकरण केंद्र येथे केला जाणारा पाणीपुरवठा सध्या जॅकवेलच्या खालच्या गेटमधून केला जात आहे. शेवाळमिश्रित व इतर जैविक मटेरियलमुळे पाणी पिवळसर होऊन ते जलशुद्धीकरण केंद्र येथे येत आहे. जॅकवेलचे खालचे गेट बंद करून वरील बाजूच्या गेटमधून पाणीपुरवठा करण्याची उपाययोजना मनपाच्या वतीने केली जात आहे. हरंगूळ येथील जलशुद्धीकरण केंद्रात आलेले पाणी स्थिर व्हावे यासाठी सध्या शहरात चार दिवसाऐवजी सात दिवसांना पाणीपुरवठा केला जात आहे.

मांजरा धरणातून पाणीपुरवठा होणाऱ्या सर्वच शहरांमध्ये सध्याही समस्या जाणवत असून लातूर शहर महानगरपालिकेने निरी या संस्थेने सुचवलेल्या उपायोजना अमलात आणल्या असून सद्यस्थितीत शहरात नळाला येणारे पाणी शुद्ध आहे.या पाण्याची जिल्हा सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळे कडून दैनंदिन तपासणी केली जाते. नळाला येणारे पाणी पिण्यासाठी योग्य असून त्यामुळे आरोग्याला काहीही धोका नाही

# पहलगाम दुर्घटनेत जखमी व त्यांच्या कुटुंबियांसाठी महापालिका रुग्णालयांकडून मानसिक आरोग्य सेवा



मुंबई, : पहलगाम येथे नुकत्याच झालेल्या दुर्घटनेनंतर जखमी व त्यांच्या कुटुंबीयांसाठी मुंबई महानगरपालिकेच्या (१) टोपीवाला नॅशनल मेडिकल कॉलेज आणि बीवायएल नायर हॉस्पिटल, (२) गोरधनदास सुंदरदास मेडिकल कॉलेज आणि केइएम हॉस्पिटल, (३) लोकमान्य टिळक म्युनिसिपल मेडिकल कॉलेज आणि लोकमान्य टिळक म्युनिसिपल जनरल हॉस्पिटल तसेच (४) हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे मेडिकल कॉलेज आणि आर एन कूपर हॉस्पिटलमध्ये मानसिक आरोग्य सेवा विविध पातळ्यांवर उपलब्ध करून दिल्या आहेत.

मुंबईतील या चार प्रमुख महापालिका रुग्णालयांमध्ये सकाळी ९ ते सायं. ४ वाजेपर्यंत समुपदेशन, तीव्र तणावाचे मूल्यमापन, पीटीएसडी (पोस्ट ट्रॉमॅटिक स्ट्रेस डिसऑर्डर) ची शक्यता, औषधोपचार आणि आवश्यकतेनुसार रुग्णालयात भरती यासह सेवा दिल्या जाणार आहेत.

याच रुग्णालयांमध्ये सायं. ४ ते सकाळी ९ या वेळेत तणाव, निद्रानाश, अस्वस्थता, घटना पुन्हा अनुभवण्याची भावना यासाठी आपत्कालीन समुपदेशन व औषधोपचाराची सुविधाही उपलब्ध करून देण्यात आली आहे.

हिटगुज (HITGUJ) या आत्महत्येच्या प्रतिबंधासाठीच्या ०२२–२४१३१२१२ या दूरध्वनी हेल्पलाइनचा वापर करून सकाळी ९ ते सायं. ४ पर्यंत तज्ज्ञ समुपदेशक मानसिक लक्षणांची तपासणी करतील व आवश्यकतेनुसार रुग्णालयात पाठवण्यात येईल.

अधिक माहितीसाठी संपर्क करा :नायर हॉस्पिटलडॉ. हेनल शाह (इन्चार्ज) : ९३२३१९३५०५, डॉ.जान्हवी केदारे (युनिट प्रमुख) : ९३२२२ ३९९९७ डॉ.अल्का सुब्रमण्यम: ९८२०१४३२४५केइएम हॉस्पिटल डॉ.अजित नायक (विभाग प्रमुख) : ९८७०३ १४८४४, डॉ. नीना सावंत (युनिट प्रमुख) : ९९३०५८३७१३, डॉ.क्रांती कदम : ९९२०९ ६९०८८,डॉ.शिल्पा आडारकर : ९८२०१ ३९१५८, सायन हॉस्पिटल, डॉ.निलेश शाह (विभाग प्रमुख) : ८८७९५६४५३२, डॉ.हिना मर्चंट : ९९३०३९५६७९, कूपर हॉस्पिटल, डॉ .देवराज सिन्हा (इन्चार्ज) : ९८६९९८९८९४.

# सर्वसामान्यांचे जीवन सुकर होण्यासाठी प्रयत्न करा – विभागीय आयुक्त दिलीप गावडे



छत्रपती संभाजीनगर : सर्वसामान्यांचे जीवन सुकर होण्यासह त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न करा तसेच १०० दिवस आराखड्यातील सात कलमी कार्यक्रमांची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे निर्देश विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांनी दिले.

विभागीय आयुक्त कार्यालयात १०० दिवस कृती आराखड्याच्या अनुषंगाने आयोजित आढावा बैठकीत विभागीय आयुक्त श्री. गावडे बोलत होते. याप्रसंगी अपर आयुक्त खुशालसिंह परदेशी, नगरविकास विभागाचे देविदास टेकाळे यांच्यासह विविध विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

विभागीय आयुक्त श्री. गावडे म्हणाले, सर्वसामान्य नागरिकांचे दैनंदिन जीवन अधिक सुकर तसेच सुलभ व्हावे यासाठी राज्य शासनाने १०० दिवसांचा कृती आराखडा तयार केला आहे. कृती आराखड्यामध्ये तयार करण्यात आलेला सात कलमी कार्यक्रम प्रभावीपणे राबवावा. नागरिकांच्या सोयीसुविधा, प्रशासनातील सुधारणा आणि उद्योजकांना गुंतवणूकीसाठी प्रोत्साहन यावर भर दिला जाणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

प्रत्येक विभागाने आपल्या संकेतस्थळावरील माहिती अद्ययावत ठेवावी, आपल्या कार्यालयांचे अधिकृत संकेतस्थळ अधिक माहितीपूर्ण आणि नागरिकांसाठी उपयुक्त करण्यावर भर द्यावा. नागरिकांच्या दैनंदिन जीवनातील अडचणी कमी करण्यासाठी विविध सेवांचे सुसूत्रीकरण करण्यात यावे. नागरिकांना वेळेत सेवा देण्यासाठी प्रशासन म्हणून आपण तत्पर असायला हवे, असे श्री गावडे म्हणाले. गुंतवणूक वाढविण्यासाठी अनुकूल वातावरण निर्माण करण्याचे प्रयत्न सर्वांनी करावेत. उद्योजकांची कुठेही अडवणूक होणार नाही, यासाठी दक्ष राहण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

‘सुंदर माझे कार्यालय’ या संकल्पनेअंतर्गत शासकीय विभागातील प्रत्येक कार्यालय स्वच्छ, सुटसुटीत, आणि कार्यक्षम ठेवण्यासाठी स्वच्छता मोहीम राबवावी, यासाठी कार्यालयीन अभिलेख अद्ययावत करण्यात यावे. अनावश्यक साहित्य निर्लेखित करण्यात यावे.

कार्यालयात नागरी सुविधा पुरविण्यात याव्यात, यामध्ये शासकीय कार्यालयामध्ये स्वच्छ पिण्याच्या पाण्याची सुविधा, कार्यालयातील स्वच्छतागृहे स्वच्छ ठेवणे, अभ्यागत कक्ष निर्माण करावा, कार्यालयाची रंगरंगोटी व सुशोभीकरण यावर भर देण्यात यावा. अधिकाऱ्यांनी जिल्ह्याच्या विविध भागांना भेट देऊन प्रत्यक्ष अंमलबजावणीवर लक्ष ठेवावे, दोन दिवस क्षेत्रीय भेटीसाठी राखून ठेवावा, तसेच क्षेत्रीय भेटीमध्ये शासनाच्या महत्त्वकांक्षी व पथदर्शी योजनांचा आढावा घेण्यात यावा, अशा सूचना विभागीय आयुक्त श्री गावडे यांनी दिल्या.

१०० दिवस कृती आराखड्यानुसार संकेतस्थळांचे अद्ययावतीकरण, सुकर जीवनमान, गुंतवणुकीस प्रोत्साहन, स्वच्छता, जनतेच्या तक्रारींचे निराकरण, कार्यालयीन सोयी व सुविधा, क्षेत्रीय कार्यालयांना भेटी याबाबतही विभागनिहाय आढावा घेण्यात आला.

यावेळी विभागीय पातळीवरील कार्यालयांचे प्रमुख अधिकाऱ्यांनी आपल्या विभागात सुरू असलेल्या कामकाजाबाबत माहिती दिली.

# कोल्हापूर विभागीय माहिती उपसंचालक पदाचा प्रवीण टाके यांनी स्वीकारला पदभार



कोल्हापूर, :– माहिती व जनसंपर्क महासंचालनालयातील वरिष्ठ अधिकारी श्री.प्रवीण टाके यांनी आज कोल्हापूर विभागीय माहिती उपसंचालक या पदाचा कार्यभार स्वीकारला. विभागीय माहिती कार्यालय, कोल्हापूर येथे त्यांनी पदभार स्वीकारुन कामकाजाबाबत आढावा घेतला.

याप्रसंगी कोल्हापूर जिल्हा माहिती अधिकारी सचिन अडसूळ, माहिती अधिकारी वृषाली पाटील, उपसंपादक रणजित पवार, सहाय्यक अधीक्षक रवींद्र चव्हाण, विभागीय व जिल्हा माहिती कार्यालयातील कर्मचारी उपस्थित होते.

सामान्य प्रशासन विभागाच्या २२ एप्रिल रोजी काढलेल्या आदेशानुसार, माहिती व जनसंपर्क महासंचालनालयातील सात वरिष्ठ अधिकाऱ्यांची उपसंचालक (माहिती) पदावर पदोन्नती करण्यात आली आहे. या यादीत जिल्हा माहिती अधिकारी, नांदेड म्हणून कार्यरत असलेले प्रवीण टाके यांचाही समावेश आहे.

यापूर्वी त्यांनी माहिती व जनसंपर्क महासंचालनालयात रूजू झाल्या नंतर नवी दिल्ली येथील महाराष्ट्र परिचय केंद्रात जनसंपर्क अधिकारी, मंत्रालयात वरिष्ठ सहायक संचालक असताना लोकराज्यचे कार्यकारी संपादक म्हणून तर चंद्रपूर व नागपूर या दोन ठिकाणी जिल्हा माहिती अधिकारी या पदावर कार्य केले आहे . शासकीय सेवेत येण्यापूर्वी त्यांनी नागपूर पत्रिका, तरुण भारत, सामना व लोकमत या दैनिकांमध्ये पत्रकारिता केली आहे.


आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर वाचा एका क्लिकवर www.elaturprabhat.in

# रुग्णालयावर नजर ?

## संपादकीय...

शासकीय रुग्णालयातील अनागोदी ढिसाळ कारभार, सरकारी डॉक्टरांचे शहरात थाटलेले खाजगी दवाखाने, झटपट पैसा कमविण्याची वैद्यकीय अधिकारी वर्गाची इच्छा, यामुळे सामान्य रुग्णही दक्षता विभागात पाठविण्याची कसरत, सर्दी, खोकलाबी अति भयंकर महारोग भाषविण्याची डॉक्टरांची प्रक्रिया वगैरेमुळे रुग्णासह त्यांचे नातेवाईकही हदबल होऊन जातात. त्यामुळेच डॉक्टरांच्या मर्जीतून हलगर्जीपणा वाढतो आणि पुणे येथील दीनानाथ मंगेशकर हॉस्पिटल या धर्मादाय रुग्णालयात एक गर्भवतीचा प्रसुती दरम्यान मृत्यू होते आणि सरकार मायबाप जागे होऊन रुग्णालयावर ऑनलाईन मेहर नजर नियंत्रण ठेवण्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आदेश देतात ही बाब, बातमी वाचून, ऐकून अनेक रुग्णांचा आणि भावी रुग्णांचा जीव तळपत्या उन्हाळ्यातही थंड भांड्यात मनावा की सोयीनुसार मृत्यूच्या आखाड्यात पडला असेल तर त्यात नवल कसले अशीच प्रतिक्रिया व्यक्त होताना दिसते आहे.

मंगेशकर रुग्णालयाप्रमाणे असे कितीतरी रुग्ण त्याच्या रुग्णालयात मृत्युमुखी पडले असतील त्यांची गन्ति नाही, पण दीनानाथ मधील स्त्री ही लक्षणीय असल्याने गाजावाजा झाला आणि मुख्यमंत्री देवेंद्र नी फडणवीस हेही जागृत होऊन शासकीय, खाजगी धर्मादाय श्रेणीतील रुग्णालय वगैरे दवाखान्यातील रुग्णावर योग्य उपचार गोरगरिबावर मोफत उपचारापूर्वीच अनामत रक्कम उकळणे, आवाजवी फिस आकारणे वगैरे प्रकारावर ऑनलाइन नियंत्रण मुख्यमंत्री सहायता निधी व्हाट्सअप वर सुविधा वगैरेचा निर्णय लागू केल्याने सर्वसामान्य जनतेत समाधान व्यक्त केले जात आहे.

शासकीय रुग्णालय खाजगी रुग्णालयात अनेक योजना राबवून रुग्णावर उपचार केले जातात पण शासकीय निधीसह आगाऊ पैसे उकळून रुग्णाचे आर्थिक लूट केली जाते यांचीही चौकशी शासकीय यंत्रणेमार्फत करावी आणि रुग्ण नातेवाईकांची होणारी आर्थिक लूट थांबवावी अशी ही मागणी नागरिकातून होताना दिसते त्याकडेही शासकीय यंत्रणेने लक्ष केंद्रित करून सहकार्य करावे अशी लोक भावना व्यक्त होताना दिसते आहे. विशेष म्हणजे शासकीय योजना सरकारची नियत न्यायिक व चांगली असली तर वैद्यकीय अधिकारी याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करून रुग्णावर उपचार करताना आर्थिक लाभाचाच आर्थिक अधिक विचार करतात. असा आजवरचा अनेक रुग्णांना त्यांच्या नातेवाईकांना आलेला अनुभव नाकारता येण्यासारखा नसावा असे वाटते.

रुग्ण सेवा हीच ईश्र्वर सेवा ही वैद्यकीय अधिकारी यांनी पूर्वीची भावना सेवा आज घडीला राहिलेली नसून केवळ अर्थ लाभ कसा अधिकचा मिळेल हीच प्रवृत्ती बळावते आहे यावर आजच्या परिस्थितीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि धर्मदाय रुग्णालय खाजगी दवाखाने शासकीय रुग्णालयांना रुग्णांच्या उपचारासंदर्भात गोरगरीब जनतेच्या रुग्णांच्या उपचार मोफत उपचार सुविधा संबंधित ज्या काही आचारसंहिता योजना आदेश दिले आहेत त्यांची अंमलबजावणी प्रामाणिक पणे केली गेली तर रोग समाज निर्माण झाल्याशिवाय राहणार नाही. यासाठी रुग्णावर मुख्यमंत्री फडणवीस यांची कठोर मेहर नजर महत्वाची वाटते.

## सार्वभौमत्वावर हल्ला !

काश्मीरला विशेष दर्जा देणारे ३७० वे कलम हटवून केंद्र सरकारने काश्मीरचे त्रिभाजन केले. या घटनेला या ऑगस्ट मध्ये सहा वर्ष पूर्ण होतील. ३७० वे कलम हटवल्यानंतर काश्मीरमध्ये अनुचित प्रकार घडू नये यासाठी काश्मीरमध्ये कडेकोट सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात आली होती. कडेकोट सुरक्षा व्यवस्था असल्याने काश्मीरमध्ये बराच काळ शांतता होती त्यामुळे पर्यटनालाही चालना मिळाली होती. त्यामुळे नंदनवनात पुन्हा शांतता प्रस्थापित झाली असा समज निर्माण झाला होता मात्र या समजाला छेद देणारी घटना काश्मिरात घडली आहे. जम्मू काश्मीरमधील अनंतनाग जिल्ह्यातील पहलगाम येथे पाक पुरस्कृत दहशतवाद्यांनी पर्यटकांवर केलेल्या भ्याड हल्लयात २८ पर्यटक ठार झाले. या हल्लयात अनेक पर्यटक जखमी झाले. ठार झालेल्या पर्यटकात महाराष्ट्रातील सहा पर्यटकांचा समावेश आहे. या हल्लयाने देशभर संतापाची लाट उसळली आहे . पहलगाम येथे झालेला हा हल्ला भारताच्या सार्वभौमत्वावर झालेला हल्ला आहे. या हल्लयाने काश्मीरमध्ये दहशतवाद्यांनी पुन्हा डोके वर काढले असून काश्मीरमध्ये पुन्हा घातपाती कारवाया सुरू झाल्याचे स्पष्ट झाले आहे. या हल्लयाने सहा वर्षापूर्वी काश्मीरमधीलच पुलवामा येथे झालेल्या हल्लयाची आठवण झाली. सहा वर्षापूर्वी पाकिस्तानच्या जैश ए मोहंमद या दहशतवादी संघटनेने भारतीय जवानांवर केलेल्या हल्लयात ४० हून अधिक जवान शहीद झाले होते. पहलगाम येथे झालेल्या हल्लयात दहशतवाद्यांनी पर्यटकांना त्यांचा धर्म विचारुन ठार केले. दहशतवाद्यांनी हिंदू पर्यटकांना जाणीवपूर्वक टार्गेट करून ठार केले. याचाच अर्थ हा टार्गेट कीलींगचा प्रकार आहे. काश्मीरमध्ये टार्गेट किलिंगचा हा पहिलाच प्रकार आहे असे नाही. मागील वर्षी जम्मू काश्मीरच्या दिवसी जिल्ह्यातील कंदा परिसरात वैष्णवदेवीच्या दर्शनासाठी जात असलेल्या भाविकांच्या बसवर दहशतवाद्यांनी भ्याड हल्ला केला होता त्यात १० भाविक मरण पावले तर ३३ हून अधिक भाविक जखमी झाले होते. पहलगाम येथे झालेला हल्लयाला गेल्या काही दिवसात काश्मीरमध्ये झालेला सर्वात मोठा भीषण हल्ला म्हणता येईल अर्थात काश्मीर खोऱ्यात कडेकोट बंदोबस्त असूनही लहान मोठे हल्ले चालूच होते मात्र या हल्लयाने काश्मीरमध्ये पुन्हा दहशतवादी मोठ्या प्रमाणात सक्रिय झाल्याचे स्पष्ट झाले आहे. या हल्लयाने दहशतवाद्यांनी केंद्र सरकारला दाखवून दिले आहे की काश्मीरमध्ये दहशतवाद अजूनही कायम आहे. केंद्र सरकारने हा हल्ला गांभीर्याने घेतला असून या हल्लयाची चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत. भारताचे पंतप्रधान, गृहमंत्री, संरक्षणमंत्र्यांनी हा हल्ला पाकिस्तान पुरस्कृतच असून या हल्लयाला जशास तसे उत्तर दिले जाईल असा इशारा दिला आहे. पाकिस्तानने मात्र हे पाप आमचे नाही असे म्हटले आहे. पाकिस्तान काहीही म्हणो मात्र हा हल्ला पाकिस्तान पुरस्कृतच होता हे शाळकरी मुलेही सांगतील. सुंब जळाला तरी पिळ जात नाही ही म्हण पाकिस्तानसाठी तंतोतंत लागू पडते. पाकिस्तान आज अक्षरशः भिके कंगाल झाला आहे. पाकिस्तानी सरकार कटोरा घेऊन जगभर फिरत आहे मात्र त्यांना कोणीही भिक द्यायला तयार नाही . पाकिस्तानमधील जनता अक्षरशः देशोधडीला लागली आहे. एकवेळचे पोटभर अन्न मिळाले तरी पुरेसे अशी त्यांची अवस्था आहे. आपल्या देशातील नागरिकांना खायला मिळत नसताना तेथील सरकार मात्र दहशतवाद्यांना पोसत आहे. पाकिस्तान सरकार आजही दहशतवाद्यांना आर्थिक आणि लष्करी मदत करत आहे. पाकिस्तानच्या सीमावर्ती भागात आजही दहशतवाद्यांचे अड्डे सुरू आहेत. तिथे पाकिस्तानी लष्कर दहशतवादी संघटनांना प्रशिक्षण देत आहे. अनेक दहशतवादी संघटनांची कार्यालये पाकिस्तानात आहेत अशाच एका दहशतवादी संघटनेने हा भ्याड हल्ला केला असण्याची शक्यता आहे. केंद्र सरकारने या भ्याड हल्लयाची गांभीर्याने दखल घेऊन पाकिस्तानला जशास तसे उत्तर द्यावे. जर भारताने या दहशतवादी हल्लयाला प्रतिउत्तर दिले नाही तर दहशतवाद्यांची मुजोरी आणखी वाढेल आणि काश्मीरमध्ये पुन्हा दहशतवाद पसरेल. ते होऊ द्यायचे नसेल तर भारतानेही आक्रमक व्हायला हवे. प्रसंगी सर्जिकल स्ट्राईक सारखा पर्याय वापरायलाही हरकत नाही. भारताने पाकिस्तानला जशास तसे उत्तर देतानाच या दहशतवाद्यांना साथ देणाऱ्या फुटिरतावाद्यांचा देखील बंदोबस्त करावा. काश्मीरमधील अनेक फुटीरतावादी नेते दहशतवाद्यांना साथ देतात. स्थानिक फुटीरतावादी लोकांची साथ असल्याशिवाय इतका मोठा हल्ला करणे दहशतवाद्यांना शक्य नाही त्यामुळे दहशतवाद्यांशी दोन हात करताना आणि पाकिस्तानला जशास तसे उत्तर देतानाच केंद्र सरकारने ही फुटिरतावादी कीड देखील मुळापासून उखडून टाकायला हवी. आज जरी हा दहशतवादी हल्ला भारतात झाला असला तरी दहशतवाद ही केवळ भारताचीच समस्या नाही तर ती वैश्र्विक समस्या आहे. दहशतवाद आज जगातील प्रत्येक देशाचे दार ठोठावत आहे. अमेरिका, इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी जपान, रशिया, ऑस्ट्रेलिया या प्रगत देशांनाही दहशतवादाची झळ बसली आहे म्हणूनच दहशतवादाचा मुकाबला करायचा असेल तर जगातील सर्व देशांना एकत्र यावेच लागेल. पाकिस्तान सारखा देश जो सातत्याने दहशतवादाला प्रोत्साहन देतो, दहशतवाद्यांना मदत करतो अशा देशांवर आंतरराष्ट्रीय समूहाने कारवाई करावी. पाकिस्तान सारख्या दहशतवाद्यांना मदत करणाऱ्या देशांवर आंतरराष्ट्रीय समूहाने आर्थिक निर्बंध आणावेत. प्रसंगी त्या देशांवर बहिष्कार टाकून त्यांची कोंडी करावी. दहशतवाद्यांना मदत करणाऱ्या देशांची कोंडी केल्याशिवाय दहशतवाद संपणार नाही. अमेरिकेसारख्या सुपर पॉवर देशांनी त्यासाठी पुढाकार घ्यायला हवा.

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

## सिडकोकडून आगरी कोळी गावठाणेच नाहीत,तर ओबीसी नेतृत्व बदनाम करून,संपवून टाकण्याचे विकृत राजकारण होत आहे.

शुक्रवार १८ एप्रिल २०२५ रोजी दैनिक लोकसत्तात चार पाणी जाहिरात आली.नवी मुंबईतील आगरी कोळी गावठाणातील घरे न्यायालयातील निर्णयांची माहिती देऊन अनधिकृत ठरविण्यात आली आहेत.सोबत एमआरटीपी कायद्याचे संदर्भ देण्यात आले होते.यासंदर्भात अनेक गावकरी,राजकीय नेते यांना फोन करून कळविले.अनेकांनी लोकसत्ता वाचलाच नाही.असे उत्तर दिले. त्यामुळेच यासंदर्भात फेसबुक, वॉट्सप वर लिहावे असे वाटले.अर्थात लोकसत्ता सारखी वृत्तपत्रे ही आगरी कोळी ओबीसी हिताची बातमी,लेख छापतील का? हा मोठा प्रश्र्न आहे. उच्च जातींनी मागास वर्गीयांना लुटणे ही,लोकांना माहीत नसलेल्या परंतु, लोकमान्य? टिळकांसारखी लोकसत्ताक विचारप्रणाली होत आहे.? उच्चवर्णीय १५ टक्के ब्राह्मण क्षत्रिय वैश्य ही लोकसत्ता म्हणून,लोकशाहीत मान्यता पावत असल्याचा हा विषमतावादी विपरीत काळ आहे.या देशातील ८५ टक्के स्त्री शूद्रातीशुद्रांची सत्ता भारताच्या लोकशाहीतील खरी लोकसत्ता कधी येईल का?

मी रहात असलेल्या उरण शहरात येथील दिवंगत नगराध्यक्ष नगराज शेठ यांनी एक जनहित याचिका उरण येथील आगरी कोळी गावठाणा विरोधात टाकली होती.याच प्रमाणे नवी मुंबई येथे आगरी कोळी गावठाणात अनधिकृत बांधकामे आहेत? अशी जनहित याचिका काही दुष्ट लोकांनी टाकली होती.यातील जनहित कोणते ? हा मोठा प्रश्र्न आहे.ओबीसी गावात यायचे,रहायचे,मोठे व्हायचे.पुढे जाऊन तेच गाव अनधिकृत आहे असे ठरवायचे?. या देशातील उच्च जातीय ब्राह्मण क्षत्रिय वैश्य मनुवादी वृत्ती ही या देशातील ८५ टक्के मागासवर्गीय भारताच्या विरोधात जात असून,ते आम्हा ओबीसी एसी एसटी यांना कधी कळणार जनहित हा शब्द म्हणजे १५ टक्के उच्च जातीय लोकांचे हित? तेच हिंदुत्व आहे का? तेच शिवसेना भाजपाचे हिंदुत्व आमचे राष्ट्रीयत्व आहे का? आगरी कोळी ओबीसींसह एससी एसटी या सर्व समाज बांधवांनी याची उत्तरे द्यावीत अशी अपेक्षा ठेवतो.

मुस्लिम समाजातील गरीब लोकांना न्याय मिळावा म्हणून हिंदुत्ववादी भाजपा कडून वक्फ विधेयक लोकसभेत मांडले गेले.दुसऱ्यांच्या डोळ्यातील कुसळ दिसते. आपल्याच डोळ्यातील मुसळ दिसत नाही?. उच्चवर्णीय ब्राह्मण क्षत्रिय वैश्य या जमीनदार खोत सावकारांच्या नावावर,हिंदू मंदिरांच्या ट्रस्ट वर असलेल्या लाखो एकर जमिनी हिंदू ओबीसी आगरी कोळी एससी एसटी कुळे कसत असलेल्या जमिनी भूमिहीन शेतमजूर लोकांना मिळाव्यात.त्यासाठी सात वर्ष संघर्ष करून मिळविलेल्य,संविधानकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि आगरी नेते नारायण नागू पाटील यांच्या कायद्याची,अंमल बजावणी केंद्र आणि राज्य सरकार का करीत नाही? हिंदूंचे सरकार आगरी कोळी हिंदुना न्याय का देत नाही?

लोकनेते दि बा पाटील यांनी पाच हुतात्मे देऊन हजारोंचे रक्त सांडून मिळविलेल्या. सिडको पुनर्वसन साडे बारा टक्के पुनर्वसन योजनेची १००टक्के अंमल बजावणी का करीत नाही नाही.? लाखो नोकऱ्या,उद्योग यांचे खोटे आश्र्वासन देऊन,घेतलेली उरण, पनवेल,पेण तालुक्यातील पाच कोटी रुपये गुंठ्याची हजारो,हजारो एकर जमीन सेझ ला देऊन केलेली देशाची फसवणूक आहे. लोकनेते दत्ता पाटील यांनी सेझ विरोधी आंदोलन करून,आमची फसवणूक उघड केली.विकासाचा,उद्योगाचा एकही खांब उभा करण्याची लायकी नसलेल्या. रिलायन्स च्या अदानीला हाताच्या फोडासारखे जपणारे सिडको,नगर विकास खाते,महाराष्ट्र सरकार,केंद्र सरकार आगरी कोळी लोकांची घरे पाडणाऱ्या फडतूस मागास वर्गीय ओबीसी विरोधी केस, जनहित याचिका म्हणून कशी स्वीकारते?

भारतीय संविधानाच्या उद्देशिकेत सांगितलेला सामाजिक,आर्थिक,राजनैतिक न्याय,स्वातंत्र्य,समानता आम्ही ८५ टक्के मागास जनतेस दिला आहे का? मूठभर उद्योगपतींना जमिनी देणे हा न्याय होऊ शकतो का? कायद्याचे अभ्यासक वकील,आमदार,खासदार यांनी याचे उत्तर द्यावे अशी माझी नम्र विनंती आहे.

मुंबई ठाणे रायगड पालघर येथील महा मुंबई परिसराचा विकास होतोय असे सांगितले जाते.परंतु येथे हजारो वर्षे राहणारे भूमिपुत्र आगरी कोळी भंडारी ईस्ट इंडियन कराडी आदिवासी एससी हे राहत्या घरांसह,पारंपरिक व्यवसाय उद्योगांसह उध्वस्त होत आहेत.त्यांची घरे गावठाणे अतिक्रमित,अनधिकृत ठरत असताना,सिडको,एम एम आरडी,सर्व महानगर पालिका यांनी हडप्पा मोहेंजोदडो प्रमाणेच गाव गावठाणांचे नियोजन करायचे असते.हा आमचा भारतीय इतिहास शहर नियोजन करणाऱ्या आर्किटेक्ट मंडळींना समजाउन सांगावा.रोज कोटीच्या कोटींची उड्डाणे घेणाऱ्या नगर विकास खाते,सिडको यातील अधिकारी,मंत्री यांना कधीतरी जमिनीवरचे चार्वाक बुद्ध महावीर यांचे सत्य सांगावे.खाली हाथ आया था..खाली हाथ जायेगा.देशाने महाराष्ट्राने कधीतरी एखाद्या गाव खेड्यांचे आदर्श नियोजन केले आहे का?. लोकसत्ता,लोकमत, महाराष्ट्र टाईम्स,नवा काळ,पुढारी यावर कधी चर्चा करतील का?

स्वातंत्र्यानंतरही सामाजिक,आर्थिक,राजकीय न्याय या देशातील उपेक्षित,शोषित, वंचित यांना आम्ही देऊ शकलो नाही.याची लाज उच्चवर्णीय राजकारणी,धर्मकारणी, समाजकारणी,पत्रकार यांना नाहीच.परंतु जे शोषित आहेत.तेही धार्मिक गुलामी मध्येच मोक्ष आणि मुक्ती शोधत आहेत? ही अत्यंत लाजिरवाणी गोष्ट आहे.या देशातील भूमिपुत्र मागास वर्गीयांचा विकास करण्यासाठी कोणतेच कायदे उपयोगाचे नसतील ? तर त्यांना त्यांचे अस्तित्व ठेवण्यासाठी काही नवे कायदे हवेत की नाही?. मुंबईत आमची शेती होती.ती कुणी संपविली? समुद्र कुणी नासविला? जंगल कुणी लुटली? आता गावठाणे कोण लुटते आहे? एसआरए,क्लस्टर यात रहिवाशी लोकांचे नाही. तर बिल्डरांचे हित आहे. विकास आहे.या विदारक सत्याचे मूल्यमापन विधान सभेत लोकसभेत करणारा एकही लोकप्रतिनिधी आमदार,खासदार नाही?. अर्थात ही जबाबदारी ओबीसी एससी एसटी या राजकीय नेतृत्वाची होती.म्हणूनच मुंबईच्या भूमिपुत्र लोकांच्या अस्तित्वात आमचे राजकीय अस्तित्व होते? ते संपले आहे.

सिडको नगर विकास खाते ज्यांच्याकडे आहे.त्या माजी नगर विकासमंत्री एकनाथ शिंदे यांनी लोकनेते दि बा पाटील यांच्या नावाला सिडकोकडून,विरोध केला होता. त्याच सिडकोच्या नगर विकास खात्याच्या माध्यमातून येथील आगरी कोळी गावठाणे, क्लस्टर,एस आरये माध्यमातून विकसित करून,बिल्डर राजकीय युतीतून पैसा मिळवायचा.हा हेतू ठेऊनच अनधिकृत बांधकामाच्या नोटीस गावा गावात पाठविल्या जात असाव्यात? यात म्हात्रे,नाईक,ठाकूर या राजकीय नेत्यांना येणाऱ्या महापालिका निवडणुका अगोदर बदनाम करायचे. त्यांचे राजकीय अस्तित्व संपवायचे.आगरी कोळी घरे तोडून मोकळे झालेले,भुखंड विकून ठाणे रायगडच्या राजकारणात खोका पेटी म्हणून यातला काळा पैसा स्थानिक नेतृत्वास संपविण्यासाठी वापरायचा?. हे साधे मराठा ब्राह्मणी राजकारण सामान्य ओबीसी गरीबांना कळते.या साठमारीत पनवेलचे उध्वस्त आदिवासी बांधव आठ दिवस सिडको समोर उपाशी बसलेत.त्यांची बिकट अवस्था पहायला एकाही आमदार मंत्र्याला वेळ नसावा? इतका वेगवान विकास नवी नवी मुंबईत सुरू आहे? उद्या पासून आगरी कोळी कराडी लोकांवर ही वेळ सिडको, नगर विकास खाते आणणार यात शंका नाही.गावठाणे उध्वस्त होणार.

मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ब्राह्मण,सिडको नगर विकास खाते एकनाथ शिंदे या मराठ्यांकडे ? एकीकडे वैश्य अदानी,अंबानी,लोढा या भूमाफियांचा वरवंटा ठाणे मुंबई रायगडात फिरतोय.देशाच्या संविधानिक समतेची आठवण ठेवायची कुणी? अर्थात या देशात मनुस्मृतीने अधिकार नाकारलेल्या स्त्रिया,ओबीसी,एससी,एसटी यांनाच खऱ्या अर्थाने संविधानाची गरज आहे.भारतीय संविधानाने गाव गावठाण ग्रामपंचायत,पंचायत राज यांचे कायदेही सांगितले आहेत.आर्टिकल ४० पहा.सिडको शहर विकासात मूळ गावे उध्वस्त होत आहेत.सिडकोच्या आडून ओबीसीवर हल्ले करणारे आहेत कोण? आमची गावठाणे विकसित करणे,जपणे हे आमचे कर्तव्य आहे.उच्चवर्णीय राजकारण्यांचे काम नाही.

आगरी कोळी ओबीसी लोकांनी आपली गावे,घरे टिकली तरच आपले नगरसेवक, आमदार,खासदार टिकतील. आमचे राजकीय,सामाजिक,आर्थिक अस्तित्व मिटविणाऱ्या या जमीनदार खोत सावकारांना ओळखा.ज्यांच्या विरोधात जमीन हक्कांची लढाई जिंकून कुळ कायदा मिळविला.त्याच लोकांविरोधात लढून गावठाण हक्क मिळवायचा आहे.गाव कमिटी बांधा,लोकवर्गणी काढा.गावकाशा तयार करा.

जिल्हाधिकारी,भूमी अभिलेख येथे सादर करून,मग मां उच्च न्यायालय,मां सर्वोच न्यायालयात जा. तुमचे रक्षण शिवसेना भाजपाचे कडक हिंदुत्व किंवा काँग्रेस राष्ट्रवादीचे सॉफ्ट हिंदुत्व नाही. तर भारतीय संविधान करील.वक्फ विरोधी जमिनी खाणारा कायदा सुप्रीम कोर्टाने रोखला.सिडकोच्या आडून आलेला सातारी जमीनदार रोखण्यासाठी गावठाण चळवळी शिवाय पर्याय नाही.

आगरी कोळी ओबीसी राजकीय नेत्यांनी महात्मा जोतिबा फुले,डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगितलेली,उच्च जातीय मनुवादी भीषण शोषणाची,जमीनदारी सरंजामी गुलामी समजून घ्यावी.आपल्या अस्तित्वाच्या लढाईत सर्वस्वाचे बलिदान लोकनेते दि बा पाटील यांच्याप्रमाणे द्यावे. आम्ही कुणाच्याही विरोधात नाही.ही आमच्या जगण्याची साविधानिक अहिंसक लढाई आहे.तिला उघड करण्याचे, समजविण्याचे धाडस सानपाडा येथील गावकऱ्यांनी केलेय. सिडकोच्या अन्यायाविरोधात लढायला आगरी कोळी कराडी समाज मैदानात घाबरणार नाही.छत्रपती शिवराय यांचा आरमारी मावळा आहे.डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या भारतीय संविधानाचा रक्षक सैनिक आहे.आई एकवीरा मातृसत्ताक संस्कृतीचा विजय असो.

**राजाराम पाटील- ८२८६०३१४६३.**
**उरण,जिल्हा रायगड.**

## सिंधू पाणी वाटप करार रद्द करण्यास भारताची पूर्वतयारी!

नवी दिल्ली–मंगळवार २२ एप्रिल रोजी जम्मू आणि



काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यामुळे संपूर्ण देश हादरुन गेलं आहे. या हल्ल्यात २७ जणांचा मृत्यू झाला असून यानंतर केंद्र सरकार ॲक्शन मोडवर आले आहे. मंत्रिमंडळाच्या सुरक्षा समितीने पाकिस्तानमधील भारतीय दूतावास बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. सरकारने पाकिस्तानसोबत असलेल्या सिंधू नदी पाणी वाटप करार रद्द करण्याची घोषणा केली आहे. दरम्यान हे पाणी करार रद्द करण्याची तयारी सरकार कित्येक वर्षापूर्वीपासून करत असून अखेर आता भारताकडून पाकिस्तानला होणारा सिंधू नदी पाणी वाटप करार स्थगित करण्यात आले आहे. यामुळे आगामी काळात पाकिस्तानला मोठे परिणाम भोगावे लागणार आहेत.

पाकिस्तानला होणारा पाणीपुरवठा भारताकडून होत असून यामध्ये सर्वात मोठा वाटा 'सिंधू' या नदीचा आहे. ही नदी मानसरोवर येथून भारताचा टप्पा पार करुन पाकिस्तानमध्ये प्रवेश करते आणि तेथून अरबी समुद्राला जाऊन भेटते. याचप्रकारे जम्मू–काश्मीरमधून चेनाब आणि झेलम या नद्या आणि रावी, बियास आणि सतलज नद्या देखील पाकिस्तानमध्ये प्रवेश करतात. या करारामुळे पाकिस्तानला एकूण पाण्याच्या प्रवाहापैकी सुमारे ८० टक्के पाणी या नद्यांमधून मिळत आहे. मात्र पाकिस्तानकडून सातत्याने होणाऱ्या वाईट वर्तवणुकीमुळे सरकार २०१६ पासूनच पाकिस्तानसोबतचा सिंधू नदी पाणी करार रद्द करण्याच्या तयारीत होता. त्यानंतर नुकतेच झालेल्या पहलगाम हल्ल्यानंतर भारताने सिंधू नदी पाणी वाटप कराराबाबत टोकाचे पाऊल उचलले आहे.

सिंधू पाणी करार काय आहे? १९६० मध्ये पंतप्रधान जवाहरलाल नेहरू आणि पाकिस्तानचे राष्ट्रपती अयुब खान यांनी सिंधू पाणी करारावर स्वाक्षरी केली होती. सिंधू करारनुसार, भारताला रावी, बियास आणि सतलज या तीन पूर्वेकडील नद्यांचे पाणी मिळते तर पाकिस्तानला चिनाब, झेलम आणि सिंधू या पश्चिमेकडील नद्यांचे पाणी मिळते. करारानुसार, भारत आणि पाकिस्तान हे पाणी जलविद्युत आणि सिंचन यासारख्या घरगुती कारणांसाठी वापरू शकतात. तर भारत विविध कारणांसाठी पश्चिमेकडील नद्यांवर ३.६ दशलक्ष एकर फूट पाणी साठवू शकतो.

सिंधू पाणी करार रद्द केल्याने पाकिस्तानवर काय होणार परिणाम? सिंधू नदी पाकिस्तानला दरवर्षी १५४.३ दशलक्ष एकर फूट पाणी पुरवते. पाकिस्तान सिंचन, शेती आणि पिण्याच्या पाण्यासाठी या पाण्याच्या पुरवठ्यावर मोठ्या प्रमाणात अवलंबून आहे.

सिंधू नदी पाणी वाटप करारात अडथळा आल्यास पाकिस्तानच्या अर्थव्यवस्थेचा आणि ग्रामीण उपजीविकेचा महत्त्वाचा घटक असलेल्या कृषी क्षेत्रावर मोठा परिणाम होणार आहे.

कमी पाण्याची उपलब्धतेमुळे पीक उत्पादनात घट, अन्नटंचाई आणि शेतीवर अवलंबून असलेल्या ग्रामीण भागात आर्थिक अस्थिरता निर्माण होण्याची शक्यता आहे.

पाकिस्तानची होणार कोंडी सिंधू जल करार स्थगित करण्यात आल्यानंतर आता पाकिस्तान पाण्याच्या प्रत्येक थेंबासाठी तरसावे लागणार आहे. खरं तर, १९४८ मध्ये स्वातंत्र्यानंतर, भारताने आपल्या दोन प्रमुख कालव्यांचे पाणी थांबवले होते. यामुळे पाकिस्तानी पंजाबमधील १७ लाख एकर जमीन पाण्याची तहानलेली होती. यानंतर, जागतिक बँकेने मध्यस्थी केली आणि दोन्ही देशांमधील सिंधू पाणी करार पूर्ण केला. आता भारताच्या निर्णयानंतर पाकिस्तानला पुन्हा एकदा गंभीर पाणी संकटाचा सामना करावा लागू शकतो.

पाकिस्तानची जीवनदायनी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सिंधू आणि तिच्या उपनद्यांच्या पाण्यावर भारताचे नियंत्रण येताच तेथील लोकांना पाण्यासाठी वंचित राहावे लागणार आहे. पाकिस्तानची ८० टक्के लागवडीयोग्य जमीन (१६ दशलक्ष हेक्टर) सिंधू नदीच्या पाण्यावरच अवलंबून आहे. त्यामुळे पंतप्रधान मोदी यांनी घेतलेल्या या कठोर निर्णयामुळे पाकिस्तानची मोठी कोंडी होणार आहे.

# सांगली जिल्ह्याची जलक्रांतीतून समृध्दीकडे वाटचाल

सांगली : केंद्र व राज्य शासनाकडून विविध उपसा सिंचन योजना, जलयुक्त शिवार अभियान, शेततळी आदि विविध कामांसाठी भरघोस निधी मिळाल्याने सांगली जिल्हा दुष्काळमुक्तीकडे वाटचाल करीत आहे. शेतीसाठी पाणी मिळू लागल्याने दरडोई उत्पादनात वाढ होऊन जिल्ह्याची वाटचाल समृध्दीकडे होत आहे. या पार्श्वभूमिवर जल व्यवस्थापन कृती पंधरवड्याचे औचित्य साधून जिल्ह्यातील उपसा सिंचन प्रकल्पांची माहिती देणारा लेख.

जिल्ह्यात टेंभू, ताकारी, म्हैसाळ, आरफळ कालवा, कृष्णा कालवा मध्यम प्रकल्प आदिंच्या माध्यमातून जास्तीत जास्त शेती सिंचनाखाली आणून जिल्ह्याच्या विकासाला चालना देण्याचे शासनाचे प्रयत्न सुरू आहेत. हे सिंचन प्रकल्प शेतकऱ्यांना जीवनदायिनी ठरत असून या माध्यमातून दरडोई उत्पन्नात वाढ होऊन शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती सुधारत आहे. त्यामुळे साहजिकच त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठीही मदत होत आहे. टेंभू उपसा सिंचन प्रकल्प टेंभू गावाजवळील बराज वरून मूळ टेंभू उपसा सिंचन योजनेतून विविध टप्प्यांद्वारे २२ अ.घ.फू. पाणी उचलून सातारा, सोलापूर व सांगली या जिल्ह्यातील ७ तालुक्यामधील एकूण ८० हजार ४७२ हेक्टर क्षेत्रास सिंचन लाभ देणे प्रस्तावित होते. जून २०२४ अखेर ८० हजार ४७२ हेक्टर इतकी सिंचन निर्मिती ( १०० टक्के) झालेली आहे.

टेंभू विस्तारीत उपसा सिंचन प्रकल्पाकरिता ४१ हजार ३ हेक्टर सिंचन क्षेत्र व ८.०० अ.घ.फु. वाढीव पाणी वापर नियोजित गृहीत धरून एकूण १ लाख २१ हजार ४७५ हेक्टर सिंचन क्षेत्रास लाभ देणे प्रस्तावित होते. त्यानुसार टेंभू उपसा सिंचन विस्तारीत प्रकल्पास ७३७०.०३ कोटी इतक्या रक्कमेच्या तृतीय सुधारित प्रशासकीय अहवालास शासनाने दिनांक ५ जानेवारी २०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता दिली आहे.

कृष्णा कोयना उपसा सिंचन प्रकल्प कृष्णा कोयना उपसा सिंचन प्रकल्पांतर्गत ताकारी व म्हैसाळ अशा दोन स्वतंत्र उपसा सिंचन योजना आहेत. ताकारी उपसा सिंचन योजनेचा उद्गव कृष्णा नदीवर ताकारी गावाजवळ असून या योजनेद्वारे एकूण ४ टप्प्यामध्ये ९.३४ अ.घ.फू. पाणी उचलून त्याद्वारे सांगली जिल्ह्यातील खानापूर, तासगाव, मिरज, पलूस, कडेगाव व वाळवा या तालुक्यातील २७ हजार ४३० हेक्टर क्षेत्रास सिंचनाचा लाभ देण्याचे नियोजित आहे.

मूळ म्हैसाळ उपसा सिंचन योजनेचा उद्गव कृष्णा नदीवर म्हैसाळ गावाजवळ असून या योजनेद्वारे एकूण ६ टप्प्यांमध्ये १७.४४ अ.घ.फू. पाणी उचलून त्याद्वारे सांगली जिल्ह्यातील मिरज, कवठेमहांकाळ, तासगाव, जत व सोलापूर जिल्ह्यातील सांगोला व मंगळवेढा या तालुक्यातील ८१ हजार ६९७ हेक्टर क्षेत्रास सिंचनाचा लाभ देण्याचे प्रस्तावित आहे.

म्हैसाळ टप्प क्र. ३ (बेडग) मधून नवीन स्वतंत्र म्हैसाळ विस्तारीत – जत उपसा सिंचन योजना प्रस्तावित आहे. म्हैसाळ विस्तारीत – जत उपसा सिंचन प्रकल्पाकरिता २६ हजार ५०० हेक्टर सिंचन क्षेत्र व ६.०० अ.घ.फू. वाढीव पाणी वापर नियोजित गृहीत धरून एकूण १ लाख ३५ हजार ६२७ हेक्टर सिंचन क्षेत्रास लाभ देणे प्रस्तावित आहे.

कृष्णा कोयना उपसा सिंचन योजना प्रकल्पास १ लाख ३५ हजार ६२७ हेक्टर सिंचन क्षेत्र व ३२.७८ अ.घ.फू. पाणी वापर गृहीत धरून ८२७२.३६ कोटी इतक्या रक्कमेस शासन निर्णय दि. २९ डिसेंबर २०२२ अन्वये पाचवी सुधारित प्रशासकीय मान्यता दिली आहे.

आरफळ कालवा कण्हेर धरणापासून निघणारा डावा कालवा कृष्णा नदीस जेथे छेदतो तेथून पुढे त्या कालव्यास आरफळ कालवा असे संबोधतात. आरफळ कालवा (सांगली जिल्ह्याकरिता) कण्हेर व तारळी या प्रकल्पातून ३.८३ टीएमसी पाणी वापर प्रस्तावित आहे.

कृष्णा कालवा मध्यम प्रकल्प सातारा जिल्ह्यात कृष्णा नदीवर खोडशी ता. कराड येथे १५२ वर्षाचा ब्रिटिश कालीन वळवणीचा बंधारा असून नदीच्या डाव्या तीरावरून खोडशी बंधाऱ्यापासून ८६.०० कि.मी. लांबीच्या कृष्णा कालव्याद्वारे सातारा जिल्ह्यातील कराड तालुका व सांगली जिल्ह्यातील वाळवा, पलूस व तासगांव या तालुक्यातील एकूण ५० गावे येतात. येरळा नदीवर वसगडे बंधाऱ्यात पाणी सोडण्यात येते.

प्रकल्प ० ते ५६ कि.मी. पर्यंत १८६८ साली पूर्ण करण्यात आला असून महाराष्ट्र शासन निर्णय दि. २५ जून १९५६ अन्वये कृष्णा कालव्याच्या विस्तारीकरण व सुधारणा कामास मंजुरी मिळाली त्यानुसार कृष्णा कालव्याचे विस्तारीकरण व सुधारकाम सन १९७६ साली पूर्ण करण्यात आले. यानंतर वसगडे येथील येरळा नदीवरील कोल्हापूर पद्धतीचा बंधारा कृष्णा कालव्याचा टेल टँक म्हणून उपयोगात आणण्यासाठी कृष्णा कालवा विस्तारीकरण व त्यावरील वसगडे बंधारा (जिल्हा सांगली) च्या कामास सुधारीत प्रशासकीय मान्यता शासन निर्णय दि. १९ ऑगस्ट १९८८ अन्वये एकूण २४५.९६७ लक्ष रूपये किंमतीस मान्यता देण्यात आली.

# पर्यावरण बचाव, वसुंधरा सजाओ जागतिक वसुंधरा दिनानिमित्त जिल्हा परिषद प्राथमिक शाळा हाकेतांडा येथे ५१०० सीड बॉल निर्मिती.

रेणापूर : जिल्हा परिषद प्राथमिक शाळा हाकेतांडा ता. रेणापूर जि.लातूर येथे वसुंधरा दिन साजरा करण्यात आला या २२ एप्रिल वसुंधरा दिन ते १ मे महाराष्ट्र दिन या कालावधीमध्ये जिल्हा परिषद प्राथमिक



शाळा हाकेतांडा, तालुका रेणापूर जिल्हा लातूर.येथे विविध उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

त्या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना वृक्ष संवर्धनासाठी च्या विविध उपक्रमाची माहिती देण्यात आली, विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी पर्यावरणातील वातावरणीय बदलाचे महत्व लक्षात घेता, पर्यावरण विभाग 'पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग असा नामबदल करण्यात आला आहे. निसर्गाशी असलेली कटिबद्धता निश्र्चित करण्यासाठी पृथ्वी, वायु, जल, अग्नी, आणि आकाश या निसर्गाशी संबंधित पंचतत्वावर पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग कार्य करीत आहे. वातावरणातील गंभीर बदल ची आपण सर्वजण मागील काही वर्षात अनुभवत आहोत. वैश्र्विक पातळीवर या बदलांना अटकाव करण्यासाठी आणि आपली पृथ्वी म्हणजे वसुंधरा वाचवण्यासाठी व्यक्तिगत व सामुहिकपणे पर्यावरण संवर्धनासाठी व रक्षणाकरीता आपण सर्वांनी मिळून संकल्प व प्रयत्न करण्याची नितांत गरज आहे.

वसुंधरा दिनाची संकल्पना अमेरिकेतील नेरगड मैश्कन यांनी मांडली. त्यांनी अमेरिकेतील २ कोटीपेक्षा जास्त लोकांमध्ये पर्यावरणाच्या समस्याबाबत जागृती केली प्रदूषण आणि वन्यजीवांचा –हास या मुद्द्यावर तेथील समाजाच्या सर्व घरांतील लोकांना आवाज उठवला, वायु, जल, वने, वन्यजीव आणि निसर्ग यांच्या संरक्षणासाठी तेथे मोठा राजकीय दवाव निर्माण झाला, अशा प्रकारे २९७० सालापासून '२२ एप्रिल हा दिवस 'अर्थ डे' म्हणजेच वसुंधरा दिवस म्हणून जगभर साजरा केला जात आहे. म्हणून हाकेतांडा येथील जिल्हा परिषद शाळेने आपल्या एकुलत्या एका पृथ्वीचे संवर्धन व संरक्षण करण्याच्या प्रत्येकाच्या जबाबदारीचे स्मरण करून देणे हेच जागतिक वसुंधरा दिनाचे मुख्य उदिष्ट आहे म्हणून

त्याअनुषंगाने, जागतिक वसुंधरा दिन म्हणजे दिनांक २२ एप्रील ते महाराष्ट्र दिन ०१ मे २०२५ या कालावधीत पर्यावरणाचे संवर्धन व संरक्षण करणेसाठी विविध कार्यक्रमाचे आयोजन शाळेमार्फत करण्यात आले.

या कार्यक्रमाचे ब्रीद वाक्य पर्यावरण बचाव, वसुंधरा सजाओ (पर्यावरण वाचवा वसुंधरा सजवा) असे आहे सर्व विध्यार्थी व नागरिकांना पटवून दिले.

२०२५ या कालावधीत निसर्गाच्या पंचमहाभूतांच्या भूमी (जमीन), जल (पाणी), वायू (हवा), अग्नी (ऊर्जा), आकाश (संवर्धन) या घटकांपैकी किमान एका घटकावर दररोज काम करण्यात यावे. यामध्ये प्रामुख्याने सध्या घडत असलेले वातावरणातीलबदला मागची करणे नागरीकांना समजावून सांगून एक जागरूक नागरिक म्हणून त्यांनी वैयेक्तिक रित्या अथवा सामुहिक रित्या पर्यावारणाचे संरक्षण व संवर्धन करण्यासाठी एक छोटसे पाऊल

यामध्ये गावातील सर्व ग्रामस्थ यांचा सहभाग होता सर्व महिला विद्यार्थी शिक्षणप्रेमी ग्रामशिक्षण समितीचे अध्यक्ष पदाधिकारी या सर्वांनी मिळून जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व गावात वृक्ष संवर्धनासाठी पुढाकार घेतला.झाडे लावा झाडे जगवा पर्यावरणाचे संवर्धन करा अशा घोषणा देण्यात आल्या, प्रत्येक विद्यार्थ्यांना एक मूल एक झाड याप्रमाणे झाड संवर्धन करण्याची जबाबदारी देण्यात आली या दिनानिमित्त गावामध्ये वृक्ष लागवड करण्यात आली . कोया निंबोळ्या, चिंचोके, वर्ड पिंपळ इत्यादी गावरान देशी वृक्षांची लागवड करण्यासाठी चिमुकल्या चिमुकल्या हातानी गोल गोल सीड बॉल बनवलेले पाहून माता पालक हे प्रवर्तित झाल्या. या छोट्या हाताने पर्यावरणाचा संवर्धन होत आहे. लहान वयातच त्यांना पर्यावरणाच्या संवर्धनाचे धडे शाळेत देण्यात आलेले आहेत. हे पाहून गावातील महिलांनी उत्कृष्टपणे स्वतः हून सहभाग नोंदवला व सीड बॉल बनवले शाळेचे उपक्रमशील शिक्षक जाकीर शेख यांनी झाडाचे महत्व पटवून दिले या उपक्रमात ग्रामशिक्षण समितीचे अध्यक्ष त्र्यंबक राठोड,संजय चव्हाण, काशिनाथ राठोड,फुलचंद राठोड, महिला उपस्थित होत्या शाळेचे मुख्याध्यापक गणेश सावळकर यांनी व महाराष्ट्र शासनाच्या २२ एप्रिल वसुंधरा दिन ते एक मे महाराष्ट्र दिन या कालावधीतील उपक्रमाची संपूर्ण माहिती सांगितली पर्यावरणाचे संवर्धन ग्लोबल वॉर्मिंग, वृक्ष संवर्धन कसे करावे, झाडे कसे वाढवावे त्याचे संवर्धन संगोपन करावे याचे सखोल असे मार्गदर्शन केले. या उपक्रमासाठी शिक्षणाधिकारी माननीय वंदनाताई फुटाणे मॅडम तसेच रेणापूर तालुका चे गटविकास अधिकारी श्री सुमित जाधव साहेब,गटशिक्षणाधिकारी धनराज गीते साहेब, शिक्षण विषयविस्तार अधिकारी लहाने साहेब देशपांडे साहेब आणि आमच्या केंद्राचे केंद्रप्रमुख शिवाजी लोखंडे साहेब, बीआरसी चे विभाग प्रमुख भासिंगे,हनुमंत, साधन व्यक्ती छाया सदाफुले मॅडम यांनी कौतुक केले. एकंदरीत पर्यावरण पूरक कार्यक्रम उत्तमरीत्या पार पडला.

# सुफीसंत हजरत बालेपीर बाबा रह. दर्ग्याचा संदल उत्सव संपन्न...

औसा प्रतिनिधी : – औसा शहरातील याकतपुर रोड येथील परिसरातील सुफीसंत हजरत बालेपीर बाबा रह. दर्ग्याचा वार्षिक संदल उत्सव हिजरी २२ शव्वाल १४४६



(दि.२१ एप्रिल) सोमवार रोजी मोठ्या भव्यदिव्य उत्साहात साजरा करण्यात आला असून, संध्याकाळी ०६ : ३० वाजता संदल उत्सवाने सुफीसंत बालेपीर बाबाना चादर अर्पण करण्यात आली. यावेळी परिसरातील वृद्ध नागरिकासह आदी तरुण मंडळीं व नागरिकांनी आपली उपस्थिती लावली होती.

भारतीय उपखंडात सुफी संतांचा मोठा वारसा आहे. यातून भारत हे बंधुता आणि प्रेमाचे केंद्र बनले. त्यामुळे सुफी परंपरा येथे समृद्ध झाली. इस्लाम धर्माला प्रेम आणि सद्भावना मान्य असून दहशतवाद मान्य नव्हता. सूफी संप्रदायाचा समावेश इस्लाम धर्मात केला जातो. सूफी शब्दाचा अर्थ् लोकरीशी संबंधित आहे. लोकरीची घोंगडी पांघरून आपल्या मतांचा प्रचार करणाऱ्या फकिरांना सूफी असे म्हणतात. सुफीसंत हे इस्लाम धर्मातील गूढवादी आणि आध्यात्मिक विचारसरणीचे प्रवर्तक आहेत. ते प्रेम, भक्ती आणि देवाला समर्पण यावर भर देतात. त्यांनी धार्मिक विभाजनांच्या पलीकडे जाऊन वैश्र्विक बंधुत्व आणि समतेचा संदेश दिला आहे. सुफी संत हे इस्लाममध्ये एक वेगळा प्रकारचा आध्यात्मिक मार्ग आहेत, ज्यामध्ये आंतरिक शुद्धता, देवाचे प्रेम आणि भक्ती यावर जोर दिला जातो. औसा शहरातील याकतपुर रोड परिसरातील सुफीसंत हजरत बालेपीर बाबा रह. दर्गाचा प्रतिवर्षाप्रमाणे वार्षिक परंपरेनुसार संदल उत्सव संपन्न झाला असून येथील सुफीसंत हजरत बालेपीर बाबा रह. हे इ स १७७१ साली त्यांचा जन्म झाला असून, त्यांनी आपले सर्वस्व जीवन एक्या झाडाखाली बसून आपल्या जीवनाच्या कारकिर्दीत प्रत्येक जाती धर्माच्या गोरगरिबांना मदत करत इस्लाम धर्माचा प्रसार व प्रचारा बरोबर अन्य समाज बांधवांच्या प्रती त्यांची श्रद्धा व निष्ठा होती. त्यांना आजही या परिसरातील सर्वधार्मिय समाजांचे लोक मानतात. आपल्या संपूर्ण जीवनाचे आदर्श ध्येय ठेवून सर्वांसाठी माणूसकी धर्माची सेवा करत आपली सेवा बजावत इ स १८५५ साली ते स्वर्गवासी झालेत. मागील काही करोना महामारीच्या काळात त्यांचा तीन ते चार वर्षे संदल उत्सव बंद होता. सुफीसंत हजरत बालेपीर बाबा रह दर्गाचे खादीम शफीक नशीरसाब दंडिये, जमील अहमद इनामदार, जाफर इनायतअली खोजन, अलीम साहेब, सद्दाम पठाण, शफीक शेख, रिहान शेख, इरफान सय्यद, असिफ पटेल, मुक्तद्वार शेख, मजहर सिद्दीकी, मोईजोद्दीन शेख, मुखीद शेख यांच्यासह या भागातील समाज बांधव व नागरिक तसेच सुफी संतांचे अनुयायी वतीने त्यांच्या समाधीवर फुलांची माळ, चादर चढविण्यात आली.

# विद्यापीठाच्या ऑनस्क्रीन पेपर तपासणीस प्राध्यापकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

लातूर : येथील दयानंद शिक्षण संस्था संचलित,दयानंद



विज्ञान महाविद्यालयाच्या ऑनस्क्रीन मूल्यांकन (ई– कॅप) सेंटरमध्ये दि.१५ एप्रिल २०२५ पासून स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेडच्या वतीने घेण्यात आलेल्या उन्हाळी–२०२५ परीक्षेच्या पदवी अभ्यासक्रमाच्या उत्तरपुस्तिकांचे ऑनस्क्रीन मूल्यांकनाचे कार्य सुरळीतपणे सुरू झालेले आहे. यावर्षी बी.एस्सी.पदवीच्या उत्तरपुस्तिकेचे ऑनस्क्रीन मूल्यांकन प्रथमच केले जात आहे.सदरील उत्तरपुस्तिकांचे मूल्यांकन स्वारातीम विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.मनोहर चासकर,विशेष कार्यासन अधिकारी दिगंबर नेटके,प्रभारी संचालक परीक्षा व मूल्यमापन मंडळ हुशारसिंग साबळे यांच्या सुचनेनुसार दयानंद विज्ञान महाविद्यालयाच्या ई–कॅप सेंटरमध्ये उत्तमरित्या तयारी करण्यात आलेली आहे.त्यामुळे लातूर जिल्ह्यातील वेगवेगळ्या महाविद्यालयातील प्राध्यापक दयानंद विज्ञानच्या ई–कॅप सेंटरमध्ये उस्फूर्तपणे ऑनस्क्रीन मूल्यांकनाचे कार्य कर्तव्यदक्षपणे करीत आहेत.ऑफलाईन मूल्यांकनापेक्षा ऑनस्क्रीन मूल्यांकनाचे कार्य अतिशय सुलभ असल्यामुळे वेळेची बचत,कमी खर्च,बदलत्या काळानुसार तंत्रज्ञानाचा योग्य वापर,विश्र्वसनीयता,विद्यार्थ्यांचे हित,निकाल लवकर लागणे,उत्तरपुस्तिका मूल्यांकनातील संगणक हाताळणी सुलभता असे ऑनस्क्रीन मूल्यांकनाचे बरेच फायदे होणार आहेत. या पद्धतीमध्ये पेपर तपासणी केल्यामुळे बऱ्याचशा गोष्टी या संगणकाच्या मदतीने होणार आहेत त्यामुळे चुका होणार नसल्याचे प्राध्यापकाकडून सांगितले जात आहे. दयानंद विज्ञानच्या अद्ययावत संगणक व उत्तम नियोजनावर सर्व प्राध्यापकांनी समाधान व्यक्त केले आहे. तसेच उत्तरपुस्तिका तपासणीत झालेला हा बदल नवीन शैक्षणिक धोरणाचे विद्यापीठाचे यशस्वी पाऊलच आहे,अशा प्रतिक्रियाही सर्व प्राध्यापक देत आहेत.

दयानंद शिक्षण संस्था व महाविद्यालयाच्या वतीने ऑनस्क्रीन मूल्यांकनासाठी लागणारे अद्ययावत संगणक व सर्व भौतिक सुविधा उपलब्ध करून दिलेल्या आहेत. कोणतीही अडचण येऊ नये यासाठी सर्वोतोपरी तयारी केलेली आहे.दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी व सचिव रमेश बियाणी,महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्र्वर बेल्लाळे यांच्या मार्गदर्शनाखाली ई–कॅप सेंटर समन्वयक प्रा.डॉ.मनीषा गुरमे,डॉ.रोहिणी शिंदे,संगणक हाताळणी साहाय्यक ज्ञानदेव माळी,नितेश बाहेती ऑनस्क्रीन मूल्यांकनाचा यशस्वी दयानंद लातूर पॅटर्न निर्माण करण्यासाठी अथक परिश्रम घेत आहेत.

# राशिभविष्य २५ एप्रिल २०२५

मेष : शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा: पश्चिम

आपल्या कामात भरभराट होईल. अर्धांगीणीबरोबर भावनात्मक समस्या निर्माण होतील. प्रवास योग असल्याने सुखाचा होईल. उद्योग–धंद्यात चांगला होईल. आरोग्य चांगले राहील.

वृषभ : शुभ रंग:निळा, शुभ दिशा:पश्चिम

काही विशिष्ट कामात व स्थिती आपल्या बदल घडवून येईल. आर्थिक लाभ होण्याची शक्यता. उद्योग–धंद्याद वाढ होण्याची शक्यता.

मिथुन : शुभ रंग:गुलाबी शुभ दिशा:पश्चिम

राजकीय क्षेत्रात बदल होण्याची शक्यता. त्याचा फायदा घेण्याचा प्रयत्न करा. जीवनात स्थिती सामान्य राहील किंचित वाढेल. दुसऱ्याची प्रशंशा करू नका.

कर्क : शुभ रंग: काळा, शुभ दिशा:उत्तर

जबाबदारी वाढणार आहे. हाती घेतलेल्या कामात यश मिळेल. व्यापारात फायदा राहील. आलेल्या संधी सोडू नका. कुटुंबात मतभेद होऊ शकतात.

सिंह : शुभ रंग:जांभळा, शुभ दिशा:पश्चिम

मोठी हानी होण्याची शक्यता. शारिरीक स्वास्थ्यावर लक्ष दया. सांभाळून व गोड बोला. हलगर्जीपणा व स्वार्थीपणा परिणामकारक आहे.

कन्या : शुभ रंग : हिरवा, शुभ दिशा : पश्चिम

वेळेचा योग्य उपयोग करून फायदा करून घ्या. घरासंबंधी समस्या निर्माण होईल. कामात यश मिळण्याची शक्यता. अडकलेला पैसा मिळेल. व्यापारात नवीन योजनेची सुरूवात कराल.

तुळ : शुभ रंग : लाल, शुभ दिशा : उत्तर

स्पर्धा करण्यासाठी आपली अनुकलता नसणार. सामाजिक कार्य चांगले राहील. कौटुंबिक चिंता करण्याची काळजी नाही. उद्योगधंदा चांगला चालेल.

वृश्चिक : शुभ रंग:पिवळा, शुभ दिशा:पश्चिम

बोलाचाली, व्यवहार, निर्णय हे गुप्त ठेवा. स्थावर मालमत्तेविषयी वाद विवाद होतील. नौकरीतील अडचणी दूर होतील. आर्थिक स्थिती चांगली राहील.

धनु : शुभ रंग : निळा, शुभ दिशा : पूर्व

लाभ व मान–सन्मान आपल्या भाग्यात उपयोगी पडेल. भावांकडून लाभ होण्याची शक्यता, समन्वय असणे आवश्यक आहे. खाण्यापिण्यावर लक्ष द्या. तब्येत बिघडण्याची शक्यता.

मकर : शुभ रंग : पांढरा, शुभ दिशा : पूर्व

मुलांमुळे किंवा भावाकडून फायदा मिळेल. घरगुती उपयोगी वस्तू खरेदी कराल. सामाजिक कार्यात सक्रीयतेने भाग घ्याल. व्यवसायिक योजना गुप्त ठेवा.

कुंभ : शुभ रंग : केसरी, शुभ दिशा : पश्चिम

चांगली बातमी आपल्याला उत्साही बनवेल. कामात येणारे अडथळे दूर होण्याची शक्यता. कर्जापासून अंतराने राहावे. केलेल्या कामावर खुशी राहील.

मीन: शुभ रंग: हिरवा, शुभ दिशा: पश्चिम

घर, वहान खरेदी करण्याचे योग आहेत. मुलांच्या भवितव्याची चिंता दूर होईल. परमेश्वरा विषयी आस्था वाढेल. रागावर नियंत्रण ठेवा.

# इतिहासात आजचा दिवस २५ एप्रिल २०२५

अंतरराष्ट्रीय

१६०७ – ८० वर्षांचे युद्ध – नेदरलँडने जिब्राल्टरजवळ स्पेनचे आरमार बुडवले.

१७९२ – क्लॉड जोसेफ रूगे दि लिलने फ्रेंच राष्ट्रगीत ला मार्सेलची रचना केली.

१८२९ – चार्ल्स फ्रीमॅन्टल पश्चिम ऑस्ट्रेलियाला पोचला.

१८४६ – मेक्सिको व टेक्सासच्या प्रजासत्ताक मध्ये सीमावाद चिघळला. चकमकी सुरू.

१८५९ – सुएझ कालव्याची पायाभरणी.

१८६२ – अमेरिकन गृहयुद्ध – उत्तरेने न्यू ऑर्लिअन्स जिंकले.

१८९८ – अमेरिकेने स्पेनविरुद्ध युद्ध पुकारले.

१९०१ – अमेरिकेतील न्यूयॉर्क राज्यात स्वयंचलित वाहनांना नंबरप्लेट लावणे सक्तीचे केले.

१९१५ – पहिले महायुद्ध – ऑस्ट्रेलिया व न्यू झीलंडचे सैन्य तुर्कस्तानमध्ये उतरले.

१९२६ – इराणमध्ये रझा शाह पहलवी सत्तेवर.

१९४५ – दुसरे महायुद्ध – मिलानमधून नाझींची हकालपट्टी.

१९७४ – पोर्तुगालमध्ये जनतेचा उठाव. लोकशाही पुन्हा अमलात.

१९८३ – अंतराळयान पायोनियर १० सूर्यमालेच्या पलीकडे पोचले.

१९८६ – म्स्वाती तिसरा स्वाझीलँडच्या राजेपदी.

१९९० – हबल अवकाश दूरदर्शीचे प्रक्षेपण.

२००५ – जपानच्या आमागासाकी शहराजवळ रेल्वे अपघात. १०७ ठार.

२००६ – मेक्सिकोत वीज कोसळून पाच मुले ठार झाले.

२००७ – युरोपीयन खगोलशास्त्रज्ञांनी 'सुपर अर्थ'चा शोध लावला. आपल्या सूर्यमंडळापासून २० प्रकाश वर्ष दूर असून 'ग्लाइस ५८१' या लहानशा लाल ताऱ्याच्या कक्षेभोवती हा ग्रह भ्रमण करत असतो. तसेच याचे आकारमान पृथ्वीच्या दीड पट असल्याने त्याला सुपर अर्थ म्हटल्या जाऊ शकते.

राष्ट्रीय

२००६ – मणिपुरमध्ये सुरक्षा सैनिकांच्या चकमकीत ४ अतिरेकी ठार झाले.

२००७ – पुंछमध्ये मॅटेडोर दरीत कोसळून १५ जण ठार झाले.

जन्म

००३२ – मार्कस साल्व्हियस ओथो, रोमन सम्राटांचा जन्म.

१२१४ – लुई नववा, फ्रांसचा राजा यांचा जन्म.

१२२८ – कॉन्राड दुसरा, जर्मनीचा राजा यांचा जन्म.

१२८४ – एडवर्ड दुसरा, इंग्लंडचा राजा यांचा जन्म.

१५४५ – यी सुन शिन, कोरियन दर्यासारंग यांचा जन्म.

१५९९ – ऑलिव्हर क्रॉमवेल, ब्रिटीश राजकारणी, अघोषित राजा यांचा जन्म.

१८७४ – गुग्लियेमो मार्कोनी, इटलीचा संशोधक यांचा जन्म.

१९२१ – माजी केंद्रीय मंत्री, उत्तर प्रदेशाचे माजी मुख्यमंत्री हेमवतीनंदन बहुगुणा यांचा जन्म.

निधन

११८५ – अंतोकु, जपानी सम्राटाचे निधन.

१२९५ – सांचो चौथा, कॅस्टिलचा राजा यांचे निधन.

१६०५ – नरेस्वान, सयामचा राजा यांचे निधन.

१६४४ – चाँगझेंग, चीनी सम्राटाचे निधन.

१८४० – सिमिओन–डेनिस पोइसॉन, फ्रेंच गणितज्ञाचे निधन.

२००५ – स्वामी रंगनाथानंद, भारतीय तत्त्वज्ञानी; राम कृष्ण मिशनचे अध्यक्षांचे निधन.

हे पत्रक, मालक, संपादक, प्रकाशक रघुनाथ बनसोडे यांनी मुद्रक महेश मोतीराम राठोड यांनी मयूर ऑफसेट प्रिंटर्स, मेन रोड, मित्र नगर, लातूर, जि.लातूर – ४१३ ५१२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक लातूर प्रभात, पवन कॉलनी, कृपासदन शाळेजवळ, लातूर (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
संपादक – रघुनाथ वाघोजी बनसोडे, मो.८८३०२५०६४५
(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकाची जबाबदारी)
RNI No.: - MAHMAR/2017/72894